# सचिन सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित

मिठागर मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई– ४०० ०८१
(नोंदणी क्र. बी ओ एम /एच एस जी / १६२९ सन १९६८ )

**रविवार दिनांक २३ जून २०२४ रोजी झालेल्या विशेष सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.**

सचिन सहकारी गृहनिर्माण संस्थेची विशेष सर्व साधारण सभा रविवार दि. २३/०६/२०२४ रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता संस्थेच्या श्री गणेश मंदिरात आयोजित केली होती. पुढे त्यांनी नमूद केले की सभा सकाळी ठीक १०-०० वा . बोलाविली होती . परंतु पुरेशी गणसंख्या नसल्याने सभा अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात आली होती. आता ठीक १०:३० वाजले असल्याचे सांगून सभेची सुरुवात करूया असे म्हटले आणि सभेची नोटिस उपस्थित सभासदांना वाचून दाखविली.

विषय क्र. १: प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराने करारनाम्याच्या ज्या अटी व शर्ती संस्थेस कळविल्या आहेत त्याबाबत चर्चा करून सभेची मान्यता घेणे.

याविषयावर आपण चर्चा करून असे मा. सचिव म्हणाले.

त्यांनी असे नमूद केले की, संस्थेने नियुक्त केलेले D. G. & Associates च्या Ad. दीक्षिता गुप्ते यांनी सदर करारनाम्याच्या अटी व शर्ती मध्ये काही सुधारणा सुचविल्या आहेत त्याची एक प्रत अवलोकनार्थ व सुचनेसाठी संस्थेच्या कार्यालयात ठेवली होती. फक्त ३ किंवा ४ सभासदांनी ती पाहिली ज्यांनी याचा अभ्यास केला आहे त्यांनी बोलण्यास सुरुवात करावी. मा. सचिव पुढे म्हणाले की, आम्ही Ad. दीक्षिता गुप्ते यांना आजच्या सभेसाठी उपस्थित रहाण्याची विनंती केली होती. त्यांनी त्याबाबत आपली अनुमती ही कळविली होती. परंतु काही अपरिहार्य कारणास्तव आपण या सभेस उपस्थित राहू शकणार नाही असे काल संध्याकाळी उशिरा त्यांनी कळविले.

श्री. ठाकूर : मी कार्यालयात ठेवलेली कॉपी पहिली पण मला काही समजले नाही. आपण त्याची प्रत सगळ्यांस देण्यास आवश्यक होते.

मा. सचिव : त्यांची गरज नाही . तुम्ही ३ / ४ वेळा संस्थेच्या कार्यालयात येऊन ती पहिली असती तर आपणास ही ते समजले असते.

श्री. जोशी : ही कॉपी कोणी दिली आहे?

मा. सचिव : प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांनी हा ड्राफ्ट दिलेला आहे व वकिलांनी त्याचा अभ्यास केलेला आहे.

श्री. दुलंगे: आपण आता सांगितल्यावर पुनः सांगावयाचे असेल तर आज चर्चा करून काय उपयोग आहे.

मा. सचिव : आज ज्या सूचना केल्या जातील त्याचा वकिलांकडून विचार होईल व आपण पुनः मिटिंग बोलावू.

श्री. पिळणकर : यामध्ये काय महत्वाचे आहे ते सांगा?

श्री. नारवेकर : PMC कडून Final करून घ्यायला हवे होते.

मा. सचिव : यामध्ये विशेष असे काही नाही. PMC हा आपल्यासाठी काम करणार आहे. त्याचे पेमेंट हा महत्वाचा मुद्दा आहे.

श्री. लोके : सगळ्या बाबी आल्या आहेत. Arbitration च्याबाबतीत जो नावयाचे आहे.

Arbitration क्लॉज मध्ये details मध्ये जाणे आवश्यक आहे . Arbitration चा खर्च कोण करणार ? जो fault मध्ये आहे त्याने करावयाचा असे आहे.

मा. सचिव : तुमचा मुद्दा बरोबर आहे.

श्री. बर्वे : Advocate ने ज्या सुधारणा सुचविल्या आहेत त्यापैकी २-३ मुद्दे सांगावेत.

मा. सचिव : अटी व शर्तीची कॉपी कार्यालयात ठेवली होती वकिलांनी सुचविलेल्या सुधारणा लाल अक्षरात दाखविलेल्या आहेत.

श्री. दुलंगे : Dispute साठी Central Govt. मध्ये एक Departme आहे . पेमेंट terms महत्वाच्या आहेत.

मा. सचिव : PMC नेमल्यावर आपल्याला Legal binding येते. त्यांनी योग्य पद्धतिने काम केले नाही तर त्यांना काढून टाकता आले पाहीजे. त्यांनी Presentation २-३ stages मध्ये केले. ते काम चांगले करतात / करतील असे वाटते. Arbitration चा मुद्दा असणे बरोबर आहे पण तो नावापुरता आहे. वाद होत नाहीत तोपर्यंत त्याची आवश्यकता भासणार नाही. त्यांनी Balance Agreement केले आहे आणि त्यामध्ये वकिलांनी मेजर Changes केलेले नाहीत.

श्री. विध्वंस : Agreement चांगली आहे, Clarity चांगली आहे. आपण त्यास मान्यता देऊया.

२४० लाखाचे मानधन तुम्ही २०० लाख केले त्याबद्दल व्यवस्थापन समितीचे अभिनंदन.

मा. सचिव : आपण Finalise करावे. श्री. लोके व इतर ३-४ जण वकिलाबरोबर चर्चेसाठी येऊ शकता. या draft agreement ला विशेष सर्वसाधारण सभेने मान्यता द्यावी. हे ॲग्रीमेंट तयार करत असताना त्याच वेळी आमचे PMC शी बोलणे चालू आहे. ते Tender तयार करत आहेत. Tender वरच्या चर्चेच्या वेळी आपण PMC ला बोलावू कारण ते Documents महत्वाचे आहेत. कोणाला काही बोलावयाचे नसेल तर आपण आता ठराव करूया.

श्री. शिरशीकर : Arbitration clause घालावा.

मा. सचिव : मी ठराव वाचतो. PMC नी पाठविलेल्या अटी व शर्ती चे Agreement कायदेशीर सल्लागाराने पहिले आहे.

ठराव करण्यात येतो की, PMC नी पाठविलेल्या Draft Agreement मधील अटी व शर्तीवर संस्थेच्या कायदेशीर सल्लागार Ad. दीक्षिता गुप्ते यांजबरोबर चर्चा करून त्यास अंतिम स्वरूप देण्यास व PMC बरोबर करारनामा करण्यास ही वि.स. सभा मान्यता देते व देत आहे.

सूचक : श्री. मंदार विध्वंस अनुमोदक : श्री. सुनील दुलंगे

ठरवास सर्वांनी पाठिंबा दिलेला आहे कोणीही विरोध केला नाही.

मा. सचिव : ठराव सर्वानुमते पारित झाला आहे.

मा. अध्यक्षांच्या परवानगीने ही सभा संपन्न झाल्याचे जाहीर करतो.

Milind

मा. सचिव